# (५) शेजारती

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता । करा साईनाथा ॥
चिन्मय हें सुखधामा जाउनि पहुडा एकांता ॥ ध्रु० ॥

वैराग्याचा कुंचा घेउनि चौक झाडीला ।
बाबा चौक झाडीला ।
तयावरी सुप्रेमाचा शिडकावा दिधला ॥ आतां० ॥ १ ॥

पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ती ।
बाबा नवविधा भक्ती ।
ज्ञानाच्या समया लावुनि उजळल्या ज्योती ॥ आता० ॥२ ॥

भावार्थाचा मंचक हृदयाकाशी टांगिला ।
हृदयाकाशीं टांगिला ॥
मनाची सुमने करूनि केलें शेजेला ॥ आतां० ॥ ३ ॥

द्वैतांचे कपाट लावुनि एकत्र केलें ।
बाबा एकत्र केलें ॥
दुर्बुद्धीच्या गांठी सोडूनि पडदे सोडिले ॥ आता० ॥ ४ ॥

आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनि गलबला ।
बाबा सांडुनि गलबला ॥
दया क्षमा शांति दासी उभ्या सेवेला ॥ आता० ॥ ५ ॥

अलक्ष्य उन्मनी घेउनी बाबा नाजुक दुशाला ।
बाबा नाजुक दुशाला ॥
निरंजन सद्गुरू स्वामी निजे शेजेला ॥ आतां० ॥ ६ ॥